# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 67 / 2023 दिनांक : 12.02.2023

## पोलीस स्टेशन ईस्लापुर येथील कथित मारहाण प्रकरणात व्हॉयरल झालेल्या व्हिडीओ बाबत प्रेसनोट

पोलीस स्टेशन मध्ये अर्धनग्न करून युवकांना मारहाण करण्यात येत असले बाबत चा एक व्हिडीओ (चित्रफित) व्हायरल झाली आहे.

सदर व्हिडीओ बाबत **मा. श्रीकृष्ण कोकाटे,** पोलीस अधिक्षक, नांदेड यांनी सदर घटनेची सत्यता पडताळणी करण्यासाठी उप विभागीय पोलीस अधिकारी कंधार, यांचे कडे सदर प्रकरणाची प्राथमिक चौकशी देण्यात आली असुन यामध्ये सखोल चौकशी करून, पिडीत व्यक्तीचे जाब जबाज घेवून योग्य ती कार्यवाही करण्यात येणार असुन चौकशी पुर्ण होई पर्यंत सपोनि रघुनाथ शेवाळे, पो.स्टे. इस्लापुर यांना पोलीस नियंत्रण कक्ष, नांदेड येथे सलग्न करण्यात आले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 68/2023 दिनांक : 12.02.2023**

## 1)घरफोडी :–

**विमानतळ :–** दिनांक 03.02.2023 रोजी 07.30 वा. ते दिनांक 10.02.2023 रोजी 19.30 वा चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी बालाजी नगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांचे घराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून सोन्याचे चांदीचे दागीने व नगदी असा एकुण 2,01,000/–रूपयेचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी गजानन चंद्रकांत येरमवार, वय 24 वर्षे, व्यवसाय व्यापार किराणा रा. बालाजीनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 49/2023 कलम 454,457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री रोडे, मो.क्रं. 8275969006** हे करीत आहेत.

## 2)मोबाईल चोरी :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 11.02.2023 रोजी 14.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरासमोर सुनिलनगर बळिरामपुर, ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी घरी असतांना व तिची घरमालकीन ही कामानिमित्त सिडको येथील बॅकेत गेली असता यातील नमुद आरोपीने जुन्या भांडणाचे कारणावरून फिर्यादीचे घरासमोर येवुन तुझी घरमालकीन कुठे गेली माझ्यावर केलेली केस मागे घ्यायला सांग असे म्हणुन शिवीगाळ करून त्याच्या हातातील पाण्याची बॉटल फिर्यादीचे डोक्यात मारल्याने फिर्यादी ही भीतीपोटी घराच्या बाहेर पळुन गेले असता आरोपीने घरातील फिर्यादीचे युको बॅकेचे ए.टी.एम. व विवो कंपनीचा मोबाईल किंमती 18,000/–रूपयाचा चोरून घेवुन घरासमोर लावलेली ॲक्टीव्हा स्कुटी क्रमांक एम.एच./26–सी.बी.–4115 हिस दगडाने मारून तोडफोड करून अंदाजे 50,000/–रूपयाचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी निकीता भगवान गोवंदे, वय 20 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. गोविंदनगर, महाराणा प्रताप चौक, नांदेड ह.मु. सुनिलनगर, बळीरामपुर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 86/2023 कलम 380,323,504,427 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/581 मांजरमकर, मो.क्र. 9324546300** हे करीत आहेत.

## 3)मोटार सायकल चोरी :–

**1)शिवाजीनगर :–**दिनांक 10.02.2023 रोजी 00.30 वा. ते 02.00 वा. चे दरम्यान, **डॉ. प्रमोद धोंडे हॉस्पीटल समोर शिवाजीनगर, नांदेड,** यातील फिर्यादी यांची ज्युपीटर कंपनीची स्कुटी क्रमांक एम.एच./26–बीआर–0072 किंमत अंदाजे 40,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी संतोष सटवाजी जाधव, वय 36 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. सोमेश कॉलनी, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्ट शिवाजीनगर** गुरनं 39/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2753 लियाकत, मो.क्र. 9923799345** हे करीत आहे.

**2)इतवारा :–**दिनांक 11.02.2023 रोजी 01.00 वा. ते 04.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरासमोरून सिध्दनाथपुरी, नांदेड,** यातील फिर्यादी यांची प्लेजर कंपनीची स्कुटी क्रमांक एम.एच./26–डब्ल्यु–7560 किंमत अंदाजे 15,000/–रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी दिगांबर गुनाजी साखरे, वय 58 वर्षे, व्यवसाय हेअर सुलून दुकान रा. सिध्दनाथपुरी, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्ट इतवारा** गुरनं 42/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गोटके, मो.क्र. 9146663355** हे करीत आहे.

## 4)रेती चोरी :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 10.02.2023 रोजी 13.50 वा. चे सुमारास, **मौजे भणगी ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांचे पथकातील अधिकारी व कर्मचारी असे नमुद ठिकाणी रेती उत्खननाची कार्यवाही करण्यासाठी गेले असता यातील नमुद चार आरोपीतांनी त्याचे ताब्यातील दोन विना नंबरचे ट्रॅक्टर रेतीने भरलेले चोरून घेवून पळुन गेले. वगैरे **फिर्यादी राजेंद्र दत्तात्रय शिंदे, वय 38 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. ओमगार्डन जवळ कौठा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 83/2023 कलम 379 भादवी सह कलम 48 म.ज.म.अधि. 1966 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1133 पेंदे, मो.क्र. 8208999464** हे करीत आहेत.

## 5)चोरी :–

**1)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 09.02.2023 रोजी 11.30 वा. ते दिनांक 10.02.2023 रोजी 06.00 वा. चे दरम्यान, **मरघाट येथील रोहित्र चौफाळा, नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांचे शाखा कार्यालय अंतर्गत असलेल्या मरघाट येथील महावितरणच्या पुरवठा करण्याच्या रोहित्र चे कॉक उघडे करून 190 लिटर ऑईल एकुण किंमती 13,300/– रूपयाचे ऑईल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी गोविंद साहेबराव काळे, वय 32 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. सन्मीत्र नगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 82/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/616 चक्रधर, मो.क्र. 7020448411** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण** :–दिनांक 10.02.2023 रोजी 01.00 वा. चे सुमारास, **हिरो होंडा शोरूमच्या बाजुस लातुर फाटा, नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांनी फिर्याद दिली की त्यांचे लातुर फाटा येथील हिरो होंडा शोरूमच्या बाजुस असलेले बी. एस.एन.एल. मोबाईल टॉवरचे 150 मीटरचे केबल वायर व एम.सी.बी. एकुण 5 असे किंमती 30,000/–रूपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी श्रीगोपाल लक्ष्मीनिवास झंवर, वय 47 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. पारसनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 81/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/शिंदे, मो.क्र. 9511851737** हे करीत आहेत.

**3)लोहा** :–दिनांक 09.02.2023 रोजी 20.30 वा. ते दिनांक 10.02.2023 रोजी 07.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरासमोर मौजे शिवकल्याणनगर लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांचे भावाचे नावे असलेला हायवा टिपर क्रमांक एम.एच./26–बीई–5411 हि नमुद ठिकाणी उभी केली असता टिपरचे दोन्ही बॅटरी किंमती 18,000/–रूपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी गौस मोहोदीन शेख, वय 36 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. शिवकल्याण ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 34/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/408 ए.एम. केंद्रे, मो.क्र. 9730726378** हे करीत आहेत.

## 6)प्राण्यांना क्रुरतेने वागणुक :–

**अर्धापूर** :– दिनांक 11.02.2023 रोजी 13.30 वा. चे सुमारास, **पार्डी बायपास अर्धापूर ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी त्याचे ताब्यातील महिंद्रा बोलेरो पिकअप क्रं एमएच–26/एडी–8996 किंमती 2,00,000/–रूपयाचे या वाहानांमध्ये बैल व गाई जातीचे एकुण 10 जनावरे एकुण किंमती 92,000/– रूपयाचे दाटीवाटीने निर्दयतेने क्रुरतेने कोंबुन वेदनादायी रित्या सदरचे जनावरे कतली साठी घेवून जात असताना, वाहतुकीचा कोणताही परवाना नसतांना बिना परवाना वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोनि/श्री हनुमंत अमृतराव गायकवाड, ने. पोस्टे अर्धापूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरन 28/2023 कलम 11(1)(ड)(ई) प्राण्यांना क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध करण्या बाबत अधिनियम 1960 कायदा सह कलम 5(अ),9,11, महाराष्ट्र प्राणीरक्षण अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री सुरवसे, मो.क्रं. 9766105366** हे करीत आहेत.

## 7)अपघात :–

**सोनखेड** :– दिनांक 10.02.2023 रोजी 19.30 वा. चे सुमारास, **प्राथमिक आरोग्य केंद्र सोनखेड समोरील रोडवर, ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे सादीक पि. खादर शेख, वय 26 वर्षे, रा. सोनखेड ता. लोहा जि. नांदेड** हे त्यांची मो.सा. क्रं. एमएच–26/बीएन–1749 वर बसुन नांदेड कडून सोनखेड कडे येत असतांना नांदेड ते सोनखेड या राष्ट्रीय महामार्गावर के.टी.आय.एल. कंपनीकडून गुत्तेदारामार्फत रस्ता रूंदीकरणाचे व उडाण पुलाचे प्राथमिक आरोग्य केंद्र सोनखेड समोर उडाण पुलाचे कामाचे ठिकाणी डांबरी रस्ता खोदून त्यांचे बाजुचे पर्यायी वळण रस्त्यासाठी कोणत्याही प्रकारची सुरक्षा उपाय योजना न बाळगता के.टी.आय.एल. कंपनीच्या निष्काळजीपणा मुळे यातील हायवा चालक क्रं. एम.एच./46–बी.बी. –0202 च्या चालकाने आपले वाहन हयगय व निष्काळजीपणाणे भरधाव वेगात चालवुन यातील मयताचे मोटार सायकल ला पाठीमागुन जोरात धडक देवून त्याचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी समीर खादर शेख, वय 26 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. सोनखेड ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं. 20/2023 कलम 279,304(अ),283,287 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री सी.आर. परिहार, मो.क्र. 9309758181** हे करीत आहेत.

## 8)जुगार :–

**नांदेड ग्रामीण** :– दिनांक 11.02.2023 रोजी 11.30 वा. चे सुमारास, **खुदबेनगर चौरस्ता मोईज मेडीकल समोर देगलुर नाका नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशीररीत्या मधुर मार्निंग नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1380/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/मारोती नारायणराव तेलंगे, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 84/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/चक्रधर, मो.क्रं. 7020448411** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड